# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
## प्रसिध्दी पत्रक

दिनांक : १८/१०/२०२२

मा. राज्य निवडणूक आयोगातार्फे जुलै २०१९ मध्ये प्रथमच लोकशाही पुरस्कार प्रदान करण्यात आले होते. त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आगामी निवडणुकांतील उल्लेखनीय कामासाठी विविध स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, अधिकारी/कर्मचारी, व्यक्ती इत्यादींना द्वितीय लोकशाही पुरस्काराने गौरविण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा मानस आहे. लोकशाही पुरस्कारांचे गट,निकष,संख्या खालील प्रमाणे :-

| अ. क्र | पुरस्काराचा गट | व्यक्ती /संस्था | निकष | पुरस्कार संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी उल्लेखनीय काम (Notable Achievement in Increasing the Voter Turnout ) | महाविद्यालये, विद्यापीठ, एनजीओ,कंपनी इ. | • गेल्या सार्वत्रिक निवडणूकीतील मतदानाच्या टक्केवारीच्या तुलनेत झालेली सर्वाधिक वाढ.<br>• मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी नावीन्यपूर्ण काम.<br>• मतदार जागृतीसाठी नाविन्यपूर्ण/प्रभावी साहित्य निर्मिती | महानगरपालिका- प्रथम, द्वितीय व तृतीय नगरपरीषद/नगरपंचायत- प्रथम,द्वितीय व तृतीय जिल्हा परिषद/पंचायत समिती – प्रथम, द्वितीय व तृतीय **(एकूण - ९)** |
| २ | मुक्त व निर्भय वातावरणातील निवडणूकासाठी योगदान (Ensuring Free and Fair Elections) | अधिकारी, कर्मचारी, पोलिस इ. | • आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी<br>• कुठल्याही दबावाला बळी न पडता आपले कर्तव्य निभावणे.<br>• कुठल्याही अनूचित प्रकाराशिवाय विनातक्रार निवडणूका पार पाडणे | महानगरपालिका- प्रथम, द्वितीय व तृतीय नगरपरीषद/नगरपंचायत- प्रथम,द्वितीय व तृतीय जिल्हा परिषद/पंचायत समिती – प्रथम, द्वितीय व तृतीय **(एकूण - ९)** |
| ३ | संगणक आणि आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर (Use of Technology to Improve the Election Process) | निवडणूक अधिकारी/कर्मचारी तंत्रज्ञ. कंपनी इ. | • निवडणूक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर<br>• नविन तंत्रज्ञानाच्या वापराची उल्लेखनीय उपलब्धी/यश | महानगरपालिका- प्रथम, द्वितीय व तृतीय नगरपरीषद/नगरपंचायत- प्रथम,द्वितीय व तृतीय जिल्हा परिषद/पंचायत समिती – प्रथम, द्वितीय व तृतीय **(एकूण - ९)** |
| ४ | अभ्यास/संशोधना द्वारे ज्ञान/माहितीचे अद्ययावतीकरण (Upgradation of Knowledge Through study and Research) | विद्यापीठ, महाविद्यालयचे सामाजिक अभ्यासक/ संशोधक इ. | • स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक संदर्भातील विश्लेषण/अभ्यास<br>• स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकाबाबतच्या समस्या अडचणीबाबतचे संशोधन | महानगरपालिका- प्रथम, द्वितीय व तृतीय नगरपरीषद/नगरपंचायत- प्रथम,द्वितीय व तृतीय जिल्हा परिषद/पंचायत समिती – प्रथम, द्वितीय व तृतीय**(एकूण - ९)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | मतदानाचे सर्वाधिक प्रमाणे (Highest Voter Tournpit) | महानगरपालिका, नगरपरीषद, नगरपंचायत जिल्हा परिषद पंचायत समिती | • सर्वाधिक मतदान झालेली स्थानिक स्वराज्य संस्था | महानगरपालिका- प्रथम, द्वितीय व तृतीय नगरपरीषद/नगरपंचायत- प्रथम,द्वितीय व तृतीय जिल्हा परिषद/पंचायत समिती – प्रथम, द्वितीय व तृतीय **(एकूण - ९)** |

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका घोषित झाल्यापासून ते प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत वरील प्रमाणे उल्लेखनिय काम करणा-या व्यक्ती आणि संस्थाना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

महानगरपालिका निवडणूकीतील उल्लेखनीय कामासाठी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत पोलिस आयुक्त/ पोलिस अधिक्षक यांचा समावेश आहे.

वरील विविध पाच गटामध्ये एकूण ४५ संस्था/व्यक्तींना पुरस्कार देण्याचा मानस असून प्रस्तावांची संख्या आणि गुणवत्ता लक्षात घेवून पुरस्कारची संख्या कमी जास्त केली जाईल असे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

त्या प्रमाणे मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठित करण्यात आली आहे.

१. आयुक्त - अध्यक्ष
२. पोलिस उपायुक्त - सदस्य
३. पोलिस उपअधिक्षक - सदस्य
४. अतिरिक्त आयुक्त (निवडणुक) उ.म.पा - सदस्य
५. अतिरिक्त आयुक्त (सेवा) उ.म.पा. - सदस्य
६. उप आयुक्त (निवडणूक) उ.म.पा. - सदस्य सचिव

सदर समितीने वर नमूद केल्याप्रमाणे गटनिहाय पुरस्कारासाठी आयोगास संस्थानिहाय व्यक्ती/ संस्थाची राज्य निवडणूक आयोगास शिफारस करावी. राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावरील निवड समितीकडून अंतिम पुरस्कार विजेत्यांची निवड केली जाईल.

(अजीज शेख)
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका